# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025



नाथाची पाग येथे माने-देशमुख विद्यालय, सोचनाबाई पाटणकर कन्याशाळा व बाळासाहेब देसाई कॉलेजतर्फे सीडबॉल टाकले. (छाया : प्रवीण जाधव)

# नाथांची पाग येथे हिरवा निसर्ग करण्यासाठी टाकले सीडबॉल

लोकमत न्यूज नेटवर्क

पाटण : पाटण रोटरी क्लब, कोयना एज्युकेशन सोसायटीचे माने-देशमुख विद्यालय, सोचनाबाई पाटणकर कन्याशाळा आणि बालासाहेब देसाई कॉलेज, पाटण याच्या संयुक्त विद्यमाने नाथाची पाग येथील माळावर तयार केलेले सीडबॉल टाकण्यात आले.

रोटरी क्लब आणि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण यांच्यामार्फत पर्यावरण संवर्धन, जनजागृतीचे कार्यक्रम करण्यात येत असतात. एप्रिल आणि मे महिन्यामध्ये तालुक्यातील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाळांमध्ये दुर्मिळ आणि वनौषधींच्या बियांची साठवणूक करण्यात आली होती. बियांचे सीडबॉल तयार करून घेतले आणि हे सीडबॉल पाटण तालक्यातील विविध ठिकाणच्या माळरानावर टाकण्यात येणार आहेत.

त्याच अनुषंगाने पाटणपासून जवळ असणाऱ्या नाथाची पाग येथील माळावर रोटरी क्लब, माने-देशमुख विद्यालय, सोचनाबाई पाटणकर कन्याशाळा आणि बालासाहेब देसाई कॉलेज, पाटण यांचे विद्यार्थी रोटरी क्लबकडून सीडबॉल टाकण्यात आले.

संजीव चव्हाण, शीलादेवी पाटणकर, डॉ. विद्या पाटील, डॉ. अर्चना देशमुख, डॉ. वीणा नांगरे, अश्विनी चव्हाण, जयदीप फुटाणे, डॉ. विलासराव कळंत्रे, डॉ. संजय पवार, प्रा. सुमित लाड, सोचनाबाई पाटणकर कन्याशाळा, माने-देशमुख विद्यालय, बाळासाहेब देसाई कॉलेजचे विद्यार्थी सहभागी झाले होते.